देशोन्नती 04/06/2022

# जबरी चोरी प्रकरणातील दोन महिला चोरट्याच्या मुसक्या आवळल्या

## शिवाजीनगर डिबी पथकाची कारवाई; दीड लाखाचा मुद्देमाल जप्त

देशोन्नती वृत्तसंकलन...

**नांदेड** ▪ चाकूचा धाक दाखवून नागरिकांना लुबाडणारी महिलांची टोळी नांदेडमध्ये उघडकीस आली आहे. रस्त्यात लुबाडणाऱ्या दोन महिलांना नांदेडच्या शिवाजीनगर पोलिसांनी अटक केली असून १ लाख ६० हजार ४१९ रुपये किंमतीचा मुद्देमालही जप्त केला आहे. सदर चोरट्या महिलांना न्यायालयासमोर हजर केले असता न्यायालयाने त्यांना ३ दिवसांची पोलिस कोठडी सुनावली आहे.



शिवाजीनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत अण्णाभाऊ साठे परिसरात असलेल्या एका रुग्णालयाजवळ कंधार तालुक्यातील माधव मोरे यांना चाकूचा धाक दाखवून १ जून रोजी लुटले होते. दत्तनगर परिसरातील अंकुर हॉस्पिटलजवळ घडली होती. शिवाजीनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत असलेल्या अंकुर हॉस्पिटलजवळ नातेवाईकांना भेटण्यासाठी कंधार तालुक्यातील आलेगाव येथील माधव आप्पाराव मोरे हे आपल्या दुचाकीवरून आले होते. त्यांनी आपली दुचाकी रस्त्याला उभी करून रेल्वे पटरीच्या बाजूला लघुशंकेसाठी थांबले होते. यावेळी त्यांच्याजवळ अनोळखी दोन महिला आणि एक पुरुष घेऊन चाकूचा धाक दाखविला आणि त्यांच्या खिशातील अगदी ३ हजार ४०० रुपये, १२ हजार ५०० रुपयाचा मोबाईल आणि एक दुचाकी असा एकूण ६५ हजार ९०० रुपयांचा मुद्देमाल जबरीने पळून नेला होता. विशेष म्हणजे चोरी केलेल्या दुचाकीवरुनच हे तिघे जण पसार झाले होते.

या प्रकरणी शिवाजीनगर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस निरीक्षक डॉ. नितीन काशीकर यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शोध पथकाचे सहाय्यक पोलीस निरीक्षक रवी वाव्हुळे, फौजदार मिलिंद सोनकांबळे, पोलीस हवालदार शेख इब्राहिम, रवी बामणे, दिलीप राठोड, देवीसिंग सिंगल, शेख अजहर यांनी तपासाची चक्रे वेगात फिरवत गुप्त माहितीवरून या चोरट्यांनी माग काढला. अर्धापूर तालुक्यातील मालेगाव येथील संशयित महिला गंगासागर उर्फ माया राजू माथेकर (३०), सीमा संतोष निळकंठे (२७) या दोघींना ताब्यात घेऊन त्यांच्याकडून गुन्ह्यात गेलेली पॅशन-प्रो कंपनीची दुचाकी, एक मोबाईल, नगदी ३ हजार ४०० रुपये असा एकूण ६५ हजार ९०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. तसेच त्यांनी वेगवेगळ्या ठिकाणाहून चोरलेले ७ अँड्रॉइड मोबाइल जवळपास ९५ हजार रुपयांचे असा एकूण १ लाख ६० हजार ४१९ रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. या गुन्ह्यातील चोरटा मात्र फरार असल्याचे पोलिसांनी सांगितले. सदर चोरट्या महिलांना न्यायालयासमोर हजर केले असता न्यायालयाने त्यांना ३ दिवसांची पोलिस कोठडी सुनावली आहे.